भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३०८ ■ सोमवार १० ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26


॥ श्री गणेशाय नमः ॥
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

## अमेरिकेकडून नियमात बदलाची तयारी पाच लाख भारतीयांवर परिणाम होणार?



**वॉशिंग्टन, दि. ९ : अमेरिकेत एच-१ बी व्हिसावर काम करणाऱ्या परदेशी कर्मचाऱ्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. नोकरी गमावल्यानंतर नवीन नोकरी शोधण्यासाठी मिळणारा ६० दिवसांचा ग्रेस पीरियड रद्द करण्याचा विचार अमेरिकन सरकारकडून सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. या बदलाचा प्रस्ताव सध्या अमेरिकेच्या ऑफिस ऑफ मॅनेजमेंट अँड बजेटकडे पाठवण्यात आला आहे. मात्र, हा नियम अद्याप लागू झालेला नाही.**

सध्याच्या नियमांनुसार, एच-१बी व्हीजाधारक कर्मचाऱ्याची नोकरी गेल्यानंतर त्याला जास्तीत जास्त ६० दिवस अमेरिकेत राहून नवीन नोकरी शोधण्याची संधी मिळते. या कालावधीत नवीन नोकरी मिळाल्यास संबंधित कंपनी एच-१बी हस्तांतरणासाठी आवश्यक प्रक्रिया सुरू करू शकते. काही परिस्थितींमध्ये अर्ज प्रलंबित असतानाही कर्मचारी नवीन नियोक्त्याकडे काम सुरू करू शकतो. मात्र, प्रस्तावित बदल लागू झाल्यास नोकरी गमावल्यानंतर अमेरिकेत राहण्याचा हा अतिरिक्त कालावधी उपलब्ध राहणार नाही. त्यामुळे नवीन नोकरी किंवा वैध इमिग्रेशन स्टेटसची व्यवस्था करण्यासाठी एच-१बी कर्मचाऱ्यांसमोर मोठे आव्हान निर्माण होऊ शकते.

**भारतीयांवर परिणामाची शक्यता**

अमेरिकेतील एच-१बी व्हिसाधारकांमध्ये भारतीय नागरिकांचा मोठा वाटा आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, अमेरिकेत एच-१बी व्हिसावर काम करणाऱ्या सुमारे पाच लाख भारतीयांवर या संभाव्य बदलाचा परिणाम होऊ शकतो. मात्र, प्रस्ताव अद्याप अंतिम झालेला नसल्याने त्याचा नेमका परिणाम किती लोकांवर होईल, हे स्पष्ट झालेले नाही. या वर्षी मे महिन्यात भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांच्याशी चर्चेदरम्यान अमेरिकेतील भारतीय नागरिकांच्या इमिग्रेशन विषयक अडचणींचा मुद्दा उपस्थित केला होता. अमेरिकेच्या इमिग्रेशन व्यवस्थेत बदल होत असताना काही अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही चर्चेत समोर आले होते.

**ग्रीन कार्डसाठीही नवा प्रस्ताव**

दरम्यान, अमेरिकेत दीर्घकाळ वास्तव्यास असलेल्या काही परदेशी नागरिकांना ग्रीन कार्ड मिळवण्याची संधी देण्यासंदर्भात सिनेटमध्ये (पान ४ वर)

## सुनेत्रा पवार यांची भेट अमित शाहांनी नाकारली

मुंबई, दि. ९ : भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील संबंधांमध्ये काहीसा तणाव निर्माण झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट नाकारल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. या घटनेमुळे महायुतीतील राजकीय समीकरणांबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

गृहमंत्री अमित शाह दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर असताना त्यांच्या स्वागतासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्यातील अनेक प्रमुख नेते उपस्थित होते. मात्र, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या शाह यांच्या विविध कार्यक्रमांमध्ये दिसल्या नाहीत. त्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली. शनिवारी अमित शाह मुंबईत कार्यक्रमात व्यस्त असताना सुनेत्रा (पान ४ वर)

## नाशिक-पुणे रेल्वेसाठी जनसागर रस्त्यावर साठ दिवसांत निर्णय द्या-आ.सत्यजीत तांबे



**नाशिक, दि.९ - नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वेचा मूळ मार्ग कोणत्याही परिस्थितीत बदलू नये, या मागणीसाठी आज क्रांती दिनाच्या निमित्ताने पुणे जिल्ह्यातील चाकण, खेड, मंचर, नारायणगाव, आळेफाटा, संगमनेर तसेच समृद्धी महामार्गावरील गोंदे फाटा आणि सिन्नर परिसरात नागरिकांनी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून चक्काजाम आंदोलन केले. विशेषतः तरुणांचा मोठा सहभाग या आंदोलनाचे वैशिष्ट्य ठरले.**

या आंदोलनाला संबोधित करताना आमदार सत्यजीत तांबे यांनी ही कोणत्याही पक्षाची भूमिका नसून जनतेच्या अनेक वर्षांच्या मागणीचे जनआंदोलन आहे, असे स्पष्ट केले.

नाशिक-पुणे रेल्वे ज्या मूळ मार्गाने प्रस्तावित झाली, त्याच मार्गाने ती झाली पाहिजे. कोणाच्याही दबावाखाली किंवा कोणत्याही कारणाने मार्ग बदलण्याचा प्रयतक आम्ही स्वीकारणार नाही, अशी ठाम भूमिका तांबे यांनी मांडली.

**६० दिवसांत निर्णय द्या; मुदतवाढ अजिबात नको**

नाशिक-पुणे रेल्वेच्या तांत्रिक अडचणींचा अभ्यास करण्यासाठी डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीला दिलेली ६० दिवसांची मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवू नये आणि ठरलेल्या मुदतीत अहवाल द्यावा, ही आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी असल्याचे तांबे यांनी सांगितले.

समिती नेमली आहे, हे स्वागतार्ह आहे. (पान ४ वर)

## मशिनरी वाटपाची चौकशी करण्याची मागणी नऊ ऑगस्टपासून बेमुदत उपोषण आंदोलन सुरु



**धुळे, दि.९ - धुळे जिल्हा परिषद अंतर्गत पंचायत समिती तसेच ग्रामीण जीवन उन्नती अभियान (उमेद) आणि मानव विकास योजना - अंतर्गत महिला बचत गटांच्या नावावर झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराची, शासन निधीच्या अपहाराची आणि महिलांच्या फसवणुकीची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी ९ ऑगस्ट २०२६ रोजी क्रांती दिनापासून बेमुदत धरणे, भजन आंदोलन व आमरण उपोषण सुरू केले आहे.**

याबाबत देण्यात आलेल्या निवेदनात धुळे जिल्हा व्यवस्थापक उद्धव धारणे, तालुका व्यवस्थापक लोकेश सोनवणे, हेमंत गवते, अभियान व्यवस्थापक ईश्वर पाटील, वर्षा हिरे, ज्योती पगारे, अकाउंटंट पराग विसपुते तसेच संबंधित प्रशासकीय जबाबदारी सांभाळणारे पी.डी. बोते व अतिरिक्त पदभार सांभाळणारे पवार साहेब यांच्या भूमिकेबाबतही चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

मानव विकास योजनेंतर्गत वितरित (पान ४ वर)

## भीषण अपघातात सहा मित्रांचा मृत्यू

धार, दि. ९ : मध्यप्रदेशातील धार जिल्ह्यात बदनावर-उज्जैन फोरलेन महामार्गावर रविवारी दुपारी झालेल्या भीषण अपघातात सहा तरुणांचा जागीच मृत्यू झाला. अपघातात एक जण गंभीर जखमी झाला. पंचकवासा गावाजवळ दुपारी सुमारे एकच्या सुमारास हा अपघात घडला. मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातमधील वडोदरा येथील सात तरुण महाकालेश्वर मंदिरात दर्शन घेऊन इको व्हॅनमधून गुजरातकडे परतत होते. यावेळी समोरून रॉंग साईडने भरधाव वेगात आलेल्या ट्रकने त्यांच्या व्हॅनला जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की, व्हॅनचा अक्षरशः चक्काचूर झाला. (पान ४ वर)

## बिलाडी धरणाची उंची वाढवण्यापूर्वी खामगावचे तातडीने पुनर्वसन करा- आ. पाडवींची मागणी



**नंदुरबार, दि.९ (प्रतिनिधी)- बिलाडी लघुपाटबंधारे प्रकल्पांतर्गत धरणाची उंची वाढविण्याच्या निर्णयाला खामगाव ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला असून, धरणाची उंची वाढल्यास गाव बुडीत क्षेत्रात जाण्याची शक्यता असल्याने खामगावचे तातडीने पुनर्वसन करावे, अशी मागणी करण्यात आली. याबाबत जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी आणि आमदार आमश्या पाडवी यांच्या उपस्थितीत आज महत्त्वाची बैठक पार पडली. बैठकीस अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, पाटबंधारे विभागाचे अभियंता राहुल पाटील यांच्यासह संबंधित अधिकारी आणि खामगाव ग्रामस्थ उपस्थित होते.**

यावेळी ग्रामस्थांनी बिलाडी धरणाची उंची वाढवू नये, अशी ठाम भूमिका मांडली. धरणाची उंची वाढवल्यास खामगाव गाव बुडीत क्षेत्रात जाण्याचा धोका असल्याने, धरणाचे काम सुरू करण्यापूर्वी गावाचे ठरलेल्या जागेवर तातडीने पुनर्वसन करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

आमदार आमश्या पाडवी यांनी प्रशासनाला खडे बोल सुनावताना सांगितले की, बिलाडी धरणाला २००८ मध्ये २५ कोटी रुपयांच्या निधीतून मंजुरी मिळाली होती. काम रखडल्याने आता या प्रकल्पाचा निधी वाढवून ११३ कोटी रुपये करण्यात आला आहे. धरणासाठी निधी वाढू शकतो, तर गावकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी टाळाटाळ का केली जात आहे?

गावकऱ्यांचा धरण बांधण्यास विरोध नसून, पुनर्वसन आधी आणि धरणाची उंची वाढविण्याचे काम नंतर, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली. एक तर धरणाचे काम थांबवा, अन्यथा आमच्या गावकऱ्यांचे ठरलेल्या जागेवर तातडीने पुनर्वसन करा, असा इशाराही आ. पाडवी यांनी प्रशासनाला दिला. (पान ४ वर)

## शिरपूरात सराफ व्यावसायिकाकडे महिलांकडून सहा ला.चे दागिने चोरी



**शिरपूर दि.९ (का.प्र.) : शहरातील गजबजलेल्या महात्मा गांधी मार्केटमध्ये असलेल्या प्रख्यात नंदुरबार सराफ ज्वेलर्स दुकानातून बुरखा घातलेल्या तीन महिलांनी हातचलाखीने सहा लाख रूपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेले. ही घटना पाच ऑगस्टला दुपारी दोनला घडली होती. चोरी करणाऱ्या महिलांच्या हालचाली सीसीटीव्ही कैद झाल्या आहेत.**

याबाबत दुकानमालक सुरेंद्र सन्मुखलाल सराफ (वय ६७, रा.सरस्वती कॉलनी) यांनी दिलेल्या (पान ४ वर)

## पैसे डबल करुन देतो सांगत व्यावसायिकाची लुट

धुळे, दि.९ - सोशल मीडियावर रीलद्वारे एक लाखाचे पाच लाख देण्याचे आमिष दाखवून परराज्यातील तरुणाला लुटल्याची घटना अजनाळे (ता. धुळे) शिवारात पुन्हा घडली. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात तीन ते चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

व्यावसायिक रिशुकुमार नवल किशोर सिंग (वय-२८, रा. जि. बितीया, बिहार) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार संशयित दिनेश पवार (रा. अजनाळे) याच्यासह अज्ञात तीन जणांविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. संशयितांपैकी एकाने १ लाख का ५ लाख और २ लाख का १० लाख मिलेंगा अशा भुलथापा (पान ४ वर)

## डिलिमिटेशनच्या नावाखाली भाजपचा विधानसभा-लोकसभा फोडणार : पवार

**बारामती, दि. ९ : डिलिमिटेशनच्या प्रस्तावित विधेयकाच्या माध्यमातून भाजप विधानसभा आणि लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना करून राजकीय समीकरणे बदलण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला. डिलिमिटेशन विधेयकावर पन्नास टक्के किंवा अन्य कोणतीही तरतूद असली तरी त्यांच्या पक्षाचे सर्व खासदार या विधेयकाच्या विरोधात मतदान करतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.**

आमदार रोहित पवार म्हणाले, मी कधीही माझी राजकीय भूमिका बदलत नाही. माझ्या भूमिकेबाबत कोणाच्या मनात शंका असेल, तर त्यांनी ती दूर करावी. डिलिमिटेशन विधेयक संसदेत मांडल्यानंतर कोण त्याच्या विरोधात मतदान करतो आणि कोण मतदानाच्या वेळी अनुपस्थित राहतो, हे स्पष्ट होईल, असे त्यांनी सांगितले. येत्या १७ ऑगस्ट पर्यंत वाट पाहावी लागेल. तोपर्यंत पुलाखालून बरेच पाणी वाहून जाईल. विधेयक संसदेत सादर झाल्यानंतरच प्रत्येकाची भूमिका स्पष्ट होईल, असे पवार यांनी नमूद केले.

दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावरही रोहित पवार यांनी टीका केली. सुनेत्रा पवार यांच्याकडे राज्याचे (पान ४ वर)

## धुळ्याप्रमाणे मुकटीत घरफोड्या बंद घरेच चोरट्यांच्या रडारावर

धुळे, दि.९ - शहरातील साक्री रोड परिसरात दोन घरात एकाच वेळी घरफोडी झाली, त्या पाठोपाठ मुकटी (ता. धुळे) येथेही व्यापाराच्या घरातून चोरट्यांनी ६४ हजारांचा ऐवज चोरुन नेला. बंद घरे चोरट्यांकडून टारगेट होत असून तीनही ठिकाणी घर बंद असल्याची चोरट्यांनी संधी साधत ऐवज नेला.

मुकटी येथील मिठाई व्यावसायिक लक्ष्मण नारायण परदेशी (वय ६४) मुकटी येथे मुख्य रोडवर घर आहे. त्यांचे घर बंद असल्याने गुरुवारी पहाटे पूर्वी चोरट्याने कुलूप तोडून आत प्रवेश केला. चार तोळ्याचा सोन्याचा चपला हार, ६० भार चांदी चैन व पैंजण असा एकूण ६४ हजारांचा ऐवज चोरून नेला. आजच्या बाजारभावानुसार या ऐवजची किंमत सात लाखांपेक्षा अधिक आहे.

याप्रकरणी लक्ष्मण परदेशी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार एम. पी. शिरसाठ तपास करीत आहेत.

शासकीय डेअरी परीसरात घरफोडी

शहरातील शासकीय डेअरी परीसरातील पार्वती नगर मधील बंद घर चोरट्यांनी आज पहाटेपूर्वी फोडले. चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला व घरातील कपाट फोडून रोकडसह दागिने असा ऐवज लंपास केला. कुटुंबीय बाहेरगावी असल्याने नेमका किती ऐवज चोरी झाला, हे समजू शकलेले नाही. घरफोडीची माहिती पोलिसांना देण्यात आली. शहर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. श्वान पथकालाही प्रचारण करण्यात आले. पथकाने परिसरातील एका मंदिरापर्यंतचा माग दाखविला.

ग्रामीण भागातही घरफोडी सुरूच...

पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या निर्देशानुसार शहरातील विविध भागात पोलिसांची गस्त सुरू असते. गस्त सुरू असूनही चोरी घरफोडीचे प्रकार सातत्याने उघडकीस येत आहेत. (पान ४ वर)

## संयुक्त किसान मोर्चा शिरपुरात आज जेलभरो

**शिरपूर दि.९ (का.प्र.) : संयुक्त किसान मोर्चा व केंद्रीय कामगार संघटना यांनी संयुक्तरित्या १० ऑगस्टला देशव्यापी जेलभरो आंदोलनाची हाक दिली असून त्याअंतर्गत येथील आशा गट प्रवर्तक संघटना, महाराष्ट्र राज्य किसान सभा, लालबावटा व शेतमजूर युनियन यांच्यातर्फे १० ऑगस्टला शहरात जेलभरो आंदोलन करण्यात येणार आहे. दुपारी बाराला शहरातील चोपडा जीनपासून संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते पायी मोर्चाने रवाना होणार आहेत.**

शहर पोलिस ठाण्यावर मोर्चा पोहचल्यावर आंदोलन करुन संघटनांतर्फे मागण्यांचे निवेदन देण्यात येणार आहे. आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन किसान सभेचे प्रदेशाध्यक्ष ॲड. हिरालाल परदेशी, लालबावटा व शेतमजूर युनियनचे जिल्हाध्यक्ष ॲड.संतोष पाटील, आशा संघटनेच्या तालुकाध्यक्ष अरुणा देवरे, कार्याध्यक्षा स्मिता दोरीक, उपाध्यक्षा मालती इंदवे, वैशाली बुवा आदिंनी केले आहे.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,37,400 रु.+3% GST
सोने- 24 K -1,50,000 रु.+3% GST
चांदी- 2,37,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## आदिवासी दिनी जल जंगल जमीनीवरील हक्कांचा हुंकार मोलगीत एकतेचा संदेश देत लोटला मोठा जनसमुदाय

**मोलगी, दि.९(प्रतिनिधी)- निसर्ग व आदिवासी हे अविभाज्य घटक असून ते एकमेकांना पूरकही आहे. या आधारे आदिवासींना जल, जंगल, जमीनीवर घटनात्मक अधिकार दिला. या हक्कांचे संरक्षण करत नैसर्गिक संसाधनांवरील अधिकारासाठी एकजुटीने लढा देण्याचा निर्धार मोलगीच्या कार्यक्रमात करण्यात आला.**



विश्व आदिवासी दिनानिमित्त मोलगी येथे आदिवासी एकता परिषद, सातपुडा आदिवासी सांस्कृतिक उत्सव समितीमार्फत रॅली काढत सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कृती रक्षक रुपसिंग वसावे होते. तर डॉ. दिलवरसिंग वसावे, माजी जि.प.सभापती सी.के.पाडवी, पिरेसिंग पाडवी, किरसिंग वसावे, माजी जि.प.सदस्य सीताराम राऊत, सरपंच तथा काँग्रेस तालुकाध्यक्ष सोन्या वसावे, निर्मला राऊत, करमसिंग पाडवी, ड.सरदारसिंग वसावे, तडवी रामा गुरुजी, हांद्या नाईक, वकील संघाचे तालुकाध्यक्ष ड.अमरसिंग वसावे, सरपंच ज्योती तडवी, प्रदिप तडवी, विजय वसावे, ॲड. रवींद्र वसावे, कॉ.बाज्या वळवी, माजी पं.स.सदस्य वाण्या वळवी, नितेश वळवी, पोलिस पाटील उमेश वळवी, सरपंच आकाश वसावे बाप पार्टीचे पदाधिकारी वाड्या वळवी, सुमित्रा वसावे, अशोक राऊत यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

मोठे प्रकल्प राबविण्यासाठी आज केवळ आदिवासी परिसरच दिसतो. त्यामुळे आदिवासींवर विस्थापनाचे संकट ओढवते, नात्याने आपण दुरावत असल्याची खंत किरसिंग वसावे यांनी व्यक्त केली. कामासाठी आदिवासी स्थलांतर करु नये असे आवाहन करत (पान २ वर)

## राज्यात पाचशे सव्वीस अनधिकृत शाळांविरूध्द गुन्हा; दंडाची कारवाई

पुणे, दि. ९ : महाराष्ट्रातील शैक्षणिक व्यवस्थेची गंभीर स्थिती पुढे आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये राज्यात तब्बल ५२६ शाळा अनधिकृतपणे सुरू असल्याचे माहिती अधिकारातून उघड झाले आहे. यामध्ये मुंबई विभागातील सर्वाधिक ४५२ शाळांचा समावेश आहे. शासनाची मान्यता तसेच यू-डायस क्रमांक घेणे बंधनकारक असतानाही नियमांचे उल्लंघन करून या शाळा सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांना आरटीआयअंतर्गत ही माहिती दिली.



राज्यातील अनधिकृत शाळांपैकी ४३ शाळा बंद करण्यात आल्या असून, १५५ शाळांविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. तसेच ४२२ शाळांना नोटीस बजावण्यात आली अथवा दंडाची कारवाई करण्यात आली आहे. मुंबई विभागातील ४५२ अनधिकृत शाळांपैकी २३ शाळा बंद करण्यात आल्या असून, १४९ शाळांवर एफआयआर दाखल करण्यात आला आहे. तर ३९६ शाळांवर नोटीस अथवा दंडाची कारवाई करण्यात आली आहे. पुणे विभागात ५३ अनधिकृत शाळा आढळल्या आहेत. त्यापैकी १४ शाळा बंद करण्यात आल्या असून, नऊ शाळांविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. नागपूर विभागात (पान ४ वर)

## निमडाळे शिवारात गौण खनिज चोरी

धुळे, दि.९ - निमडाळे (ता. धुळे) शिवारात वनविभागाच्या जागेतील गौण खनिज वाहून नेणाऱ्या ट्रॅक्टर चालकाला वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी अटकाव केला. त्यांच्याशी हुज्जत घालत दहशत निर्माण करून ट्रॅक्टर चालक वाळू उपसा करून पसार झाला. याप्रकरणी सात ते आठ जणांविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

निमडाळे शिवारात शुक्रवारी (ता.७) रात्री साडेअकराच्या सुमारास काहीजण गौणखनीजची ट्रॅक्टरने वाहतूक करीत असल्याचे वनविभाग (पान ४ वर)

## आदिवासी दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती

शहादा, दि.९(प्रतिनिधी)- नंदुरबार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचा निर्देशानुसार शहादा तालुका विधी सेवा समिती व श्रध्दा शिक्षण संस्था संचलित, श्रीमती सुशिलादेवी दगडोजीराव देशमुख, आदिवासी अनुदानीत प्राथमिक आश्रमशाळा, तलावडी (शहादा) येथे जागतिक आदिवासी दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर शिबिराचे नियोजन मा.जिल्हा न्यायाधीश -१ श्री अ व्ही गुजराथी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका विधी सेवा समिती, शहादा मार्फत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षपद वरिष्ठ विधिज्ञ भोजेंद्र पी शिंदे, तसेच वरिष्ठ विधिज्ञ के.डी.सोनार, कनिष्ठ विधिज्ञ रविंद्र जी.पावरा, विधिज्ञ चेतन एम.जगताप, विधिज्ञ व्ही पी निकुम व न्यायालयीन कनिष्ठ लिपीक गणेश पी. कुलकर्णी, तालुका विधी सेवा समिती यांनी कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

जागतिक आदिवासी दिनानिमित्त कायदेविषयक जागृती कार्यक्रमाची सुरवात विधिज्ञ रविंद्र पावरा यांनी आश्रम शाळेतील मुले व मुलींना त्यांच्या बोली भाषेत संवाद साधून आदिवासींचे हक्क आणि अधिकार विषयी सविस्तर माहिती व मार्गदर्शन केले. त्यानंतर जेष्ठ(पान २ वर)

## झुलेलाल सेवा मंडळाच्या पुढाकाराने श्री झुलेलाल साई भवन उभारणार



**नंदुरबार,दि.९ (प्रतिनिधी)- सिंधी कॉलनी परिसरातील मंदिराच्या जुन्या जागेवर श्री झूलेलाल सेवा मंडळ मंदिर समितीच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या भव्य व आलिशान श्री झूलेलाल साई भवन वास्तूचे भूमिपूजन (शिलान्यास) गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त धार्मिक व भक्तिमय वातावरणात संपन्न झाले.**

श्री झूलेलाल साईंच्या कृपाशीर्वादाने आयोजित करण्यात आलेल्या या भूमिपूजन सोहळ्यात सिंधी समाजातील संत-महात्मे, पंचायतींचे प्रतिनिधी, विविध सामाजिक व धार्मिक संस्थांचे अध्यक्ष व पदाधिकारी तसेच समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विधीवत पूजन, मंत्रोच्चार आणि भक्तिमय वातावरणात भूमिपूजनाचा सोहळा पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आगामी श्री झूलेलाल साई भवन हे सिंधी समाजाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांचे प्रमुख केंद्र ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

समाजातील विविध कार्यक्रम, धार्मिक उत्सव, सांस्कृतिक उपक्रम तसेच सामाजिक कार्यांसाठी हे भवन उपयुक्त ठरणार असून, सिंधी समाजाच्या एकजुटीला आणि सामाजिक कार्याला यामुळे अधिक बळ मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

भूमिपूजन सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी श्री झूलेलाल सेवा मंडळ मंदिर समितीचे पदाधिकारी, सदस्य तसेच समाजबांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

## पान १ वरुन

### अमेरिकेकडून नियमात बदलाची तयारी

स्वतंत्र विधेयक सादर करण्यात आले आहे. गेल्या सात वर्षांपासून अमेरिकेत सतत वास्तव्यास असलेल्या व्यक्तींना काही अटींच्या अधीन राहून कायमस्वरूपी निवासासाठी अर्ज करण्याची संधी देण्याचा प्रस्ताव या विधेयकात आहे. मात्र, हे विधेयक अद्याप कायद्यात रूपांतरित झालेले नाही. त्यामुळे एच-१बी धारकांनी प्रस्तावित नियम आणि विधेयक अंतिम होईपर्यंत त्यांच्या सध्याच्या इमिग्रेशन स्टेटसनुसारच निर्णय घेणे आवश्यक आहे. एच-१बी चा साठ दिवसांचा ग्रेस पीरियड रद्द झाल्याची घोषणा अद्याप झालेली नाही. सध्या हा केवळ प्रस्तावित बदल आहे. त्यामुळे एच-१बी धारकांना तत्काळ अमेरिका सोडावी लागणार, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल.

### नाशिक-पुणे रेल्वेसाठी जनसागर रस्त्यावर

मात्र समितीला मुदतवाढ देऊन विषय पुन्हा लांबणीवर टाकला जाऊ नये. ६० दिवसांत स्पष्ट निर्णय झाला पाहिजे, असे ते म्हणाले.

**फक्त तांत्रिक बाबी नव्हे, जनभावनेचाही विचार करा**

समितीने केवळ जीएमआरटीसंदर्भातील तांत्रिक अडचणींचा अभ्यास न करता जनतेच्या भावना समजून घेण्यासाठी प्रत्येक तालुक्यात जनसंवाद घ्यावा, अशी दुसरी महत्त्वाची मागणी तांबे यांनी केली. या समितीत डॉ. अनिल काकोडकर यांच्यासोबत नाशिक व पुणे विभागीय आयुक्त तसेच रेल्वे बोर्डाच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यामुळे तांत्रिक बाबींसोबतच या भागातील नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, कामगार आणि तरुणांच्या अपेक्षांचाही विचार समितीने करावा, असे तांबे यांनी स्पष्ट केले.

**भूसंपादनापासून टेंडरपर्यंत सगळं झालं; रेल्वेचा मार्ग बदलण्याची वेळ का?**

नाशिक-पुणे रेल्वेसाठी यापूर्वीच मोठ्या प्रमाणावर भूसंपादनाची प्रक्रिया झाली असून ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक निधीचे वाटप झाले आहे. रेल्वे स्थानकांच्या कामांसाठी टेंडर प्रक्रियाही पुढे गेली आहे. प्रकल्प इतका पुढे गेलेला असताना अचानक तांत्रिक कारणांचा आधार घेत मार्ग बदलण्याचा प्रयतक का केला जात आहे, असा सवाल तांबे यांनी उपस्थित केला. हा प्रश्न केवळ आजच्या आंदोलनाचा नाही. हा पुढच्या दोन-चार पिढ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. आज दोन-चार तास नागरिकांना त्रास झाला असेल; त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. मात्र हा संघर्ष भविष्यातील पिढ्यांसाठी आहे, असे तांबे म्हणाले. नाशिक-पुणे रेल्वेचा प्रश्न आपण यापूर्वी विधान परिषदेत मांडला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समिती स्थापन करण्याची भूमिका घेतली होती, याचीही तांबे यांनी आठवण करून दिली.

### सुनेत्रा पवार यांची भेट अमित शाहांनी नाकारली

पवार पुण्यात असल्याची माहिती आहे. त्यांनी पुण्यात कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेतल्याचेही सांगितले जाते. मंत्री अमित शाह यांच्याशी नियोजित भेट झाली नसल्यानेच त्यांनी मुंबई दौऱ्यापासून अंतर राखले का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसने राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांच्याशी संपर्क वाढवल्याच्या पार्श्वभूमीवर या चर्चेला वेगळे वळण मिळाले आहे. किशोर यांच्या राजकीय भूमिकेबाबत भाजपमध्ये नाराजी असल्याचा दावा काही सूत्रांकडून केला जात आहे. राष्ट्रवादीच्या राजकीय रणनीतीमध्ये प्रशांत किशोर यांची भूमिका वाढत असल्याने भाजप नेतृत्व नाराज असल्याची चर्चा आहे. मात्र, अमित शाह यांनी सुनेत्रा पवारांची भेट का नाकारली किंवा दोन्ही पक्षांमध्ये प्रत्यक्षात कोणताही तणाव आहे का, याबाबत अधिकृतपणे कोणतीही माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे सध्या या चर्चांकडे राजकीय वर्तुळातील तर्कवितर्क म्हणूनच पाहिले जात आहे. सुनेत्रा पवार यांची अनुपस्थिती आणि प्रशांत किशोर यांच्या राजकीय भूमिकेची चर्चा यामुळे भाजप-राष्ट्रवादी काँग्रेसमधील संबंधांबाबत नव्या चर्चांना मात्र सुरुवात झाली आहे.

### भीषण अपघातात सहा मित्रांचा मृत्यू

अपघातात व्हॅनमधील सहा तरुणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. गंभीर जखमी झालेल्या एका तरुणाला उपचारासाठी बदनावर येथील नागरी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून अपघातग्रस्त वाहने बाजूला हटवली. दरम्यान, घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाल्याने महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. या दुर्घटनेप्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. अपघाताचे नेमके कारण आणि ट्रकचालकाच्या निष्काळजीपणाबाबत चौकशी केली जात आहे. महाकाल दर्शनानंतर घरी परतणाऱ्या सहा तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### बिलाडी धरणाची उंची वाढवण्यापूर्वी खामगावचे

या प्रश्नावर वरिष्ठ स्तरावर बैठक घेऊन लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन प्रशासनाच्या वतीने देण्यात आले. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच खामगाव ग्रामस्थांनी भर पावसात मोर्चा काढून पुनर्वसनाची मागणी प्रशासनासमोर मांडली होती. त्यानंतर झालेल्या या बैठकीमुळे गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या खामगाव पुनर्वसनाच्या प्रश्नाला आता शासनदरबारी गती मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. बैठकीस सरपंच राजेश वसावे, बापू ठाकरे, राजू नहेरे, सनी पाटील, प्रवीण सावडे, प्रशांत नहेरे, संजू नंदन, जयवंत माळी, संजू वळवी, भास्कर पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

**दरेकरांकडून चौकशीची मागणी**

या घटनेवर भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. बारामतीमध्ये अशा घटना वारंवार घडत असल्याचे सांगत, यामागे तांत्रिक बिघाड आहे की अन्य काही कारण, याचा सरकारने गांभीर्याने विचार करून चौकशी करावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. विमान प्रवास करताना प्रवाशांनीही आवश्यक ती काळजी घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

**अजित पवार विमान दुर्घटनेची आठवण**

बारामतीतील या दुर्घटनेमुळे याच वर्षी जानेवारीत झालेल्या विमान दुर्घटनेच्या आठवणी पुन्हा जाग्या झाल्या आहेत. जानेवारीमध्ये एक खासगी चार्टर्ड विमान दुर्घटनाग्रस्त झाले होते. या दुर्घटनेत तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विमानातील पाच जणांचा मृत्यू झाला होता. त्या घटनेने राज्याच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. दरम्यान, रविवारी झालेल्या प्रशिक्षण विमानाच्या दुर्घटनेबाबत अधिकृत तपासानंतरच अपघाताचे नेमके कारण आणि विमानातील व्यक्तींची स्थिती स्पष्ट होणार आहे.

### धुळ्याप्रमाणे मुकटीत घरफोड्या

त्यामुळे गस्त व्यवस्थित होते की नाही असा प्रश्नही नागरिकांकडून उपस्थित होत आहे. धुळे तालुका हद्दीत गेल्या काही दिवसात सातत्याने चोरी, घरफोडी होत आहेत. चोरट्यांवर प्रतिबंध करण्यात तालुका पोलीस सबशील अपयशी ठरत आहेत. चोरट्यांचा तपास करण्याबरोबरच त्यावर प्रतिबंध करणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

### पैसे डबल करुन देतो

व आमिष देत भुरळ घातली, बहाणा करुन रिशुकुमारला बिहार येथुन धुळे व नंतर अजनाळे येथे बोलावले. संशयितांनी अजनाळे गावाजवळील धरणाजवळ जंगलात निर्जनस्थळी नेले्. तेथे दिनेश पवार याच्यासह अज्ञात तीन जणांनी हाताबुक्यांनी मारहाण केली. शिवीगाळ करुन खिशातील दोन लाखांची रोकड काढून घेतली. ऑनलाईन चोवीस हजार रुपये देण्यास भाग पाडले. असे एकूण दोन लाख चोवीस हजार रुपये बळजबरीने हिसकावून घेतले. ठार मारण्याची धमकीही दिली, असेही फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक रविकुमार पवार तपास करीत आहेत.

## पान १ वरुन

### मशिनरी वाटपाची चौकशी करण्याची मागणी

करण्यात आलेल्या मशिनरीमध्ये निकृष्ट दर्जाच्या मशिनरीचा पुरवठा झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित मशिनरी पुरवठादार व कंपनीच्या मालकांवर गुन्हे दाखल करून त्यांना काळ्या यादीत टाकावे, तसेच गरीब शेतकरी, कष्टकरी, दलित, आदिवासी आणि सर्व जाती-धर्मातील महिलांना न्याय देऊन मशिनरी परत मिळवून द्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

जिल्हा परिषदेसमोर आज ९ ऑगस्ट रोजी महिलांच्या वतीने आंदोलन करण्यात आले याप्रसंगी बापू बागुल, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या धुळे कार्याध्यक्ष भारती किशोर माळी, मनीषा पाटील रेखाबाई पाटील संगीता पाटील सरला महाले निर्मला महाले यांच्यासह अनेक महिला यावेळी उपस्थित होत्या.

निवेदनानुसार, उमेद अभियान हे ग्रामीण महिलांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणारे महत्त्वाचे अभियान आहे. हजारो महिलांना रोजगार, स्वयंरोजगार आणि उद्योगाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. मात्र काही अधिकारी व संबंधित व्यक्तींच्या कथित गैरप्रकारांमुळे अभियानाची प्रतिमा मलिन होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे हा संघर्ष उमेद अभियानाविरोधात नसून कथित भ्रष्टाचार, गैरव्यवहार, महिलांवरील अन्याय आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

मानधन व मशिनरी वाटपाची स्वतंत्र चौकशीची मागणी

मानधन व आर्थिक व्यवहारांबाबतही निवेदनात गंभीर आरोप करण्यात आले आहेत. कृषी सखी तसेच मानधनावर कार्यरत महिलांना वेळेवर मानधन न मिळणे, मानधनात कपात होणे, मूल्यांकन प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव आणि कपात झालेल्या मानधनाचा हिशेब उपलब्ध करून न देणे, या बाबींची स्वतंत्र चौकशी करून अहवाल सार्वजनिक करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

मानधन व आर्थिक व्यवहारांची चौकशी केवळ मशिनरीपुरती मर्यादित न ठेवता संबंधित सर्व व्यवहारांची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच मानव विकास योजनेंतर्गत तालुक्यात वितरित झालेल्या सर्व मशिनरीची युनिटनिहाय यादी जाहीर करून प्रत्येक मशिनरीची स्वतंत्र अधिकाऱ्यामार्फत प्रत्यक्ष पाहणी करावी. बंद, वापरात नसलेली किंवा निकृष्ट मशिनरी आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आहे.

महिलांवरील दबावाच्या आरोपांचीही चौकशी करा

तक्रार करणाऱ्या महिलांना धमकावणे, दबाव आणणे, महिलांनाच महिलांविरुद्ध उभे करणे, गावोगावी जाऊन बदनामी करणे व मानसिक त्रास देणे, अशा प्रकारच्या तक्रारीही निवेदनात करण्यात आल्या आहेत. या सर्व घटनांची स्वतंत्र चौकशी करून तक्रारदार महिलांना संरक्षण द्यावे आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाकडे जिल्हाधिकारी कार्यालय, पंचायत समिती, गटविकास अधिकारी तसेच अन्य संबंधित कार्यालयांकडे वेळोवेळी लेखी तक्रारी करूनही समाधानकारक कारवाई झाली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. शहर पोलिसांत तक्रार दिल्यानंतर कारवाईचे आश्वासन मिळाल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले होते; मात्र अद्याप गुन्हा दाखल अथवा चौकशी पूर्ण झालेली नसल्याने प्रशासनावरील विश्वास कमी होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

उमेद अभियानाविरोधात आपला लढा नसून कथित भ्रष्टाचार, गैरव्यवहार, महिलांवरील अन्याय आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात असल्याचे स्पष्ट करत, उद्धव धारणे, लोकेश सोनवणे, ईश्वर पाटील, हेमंत गवते, वर्षा हिरे, ज्योती पगारे, अकाउंटंट पराग विसपुते आदी संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, महिलांना न्याय द्यावा आणि उमेद अभियानाची विश्वासार्हता कायम ठेवावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

### डिलिमिटेशनच्या नावाखाली भाजपचा

उपमुख्यमंत्रीपद असून, जनतेच्या त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत. त्यामुळे त्यांनी टीकेला कामातून उत्तर देत धाडसी निर्णय घेऊन आपली भूमिका स्पष्ट करावी, असे ते म्हणाले. त्यांच्याच पक्षातील नेते त्यांना बोलू देत नाहीत की काय, हे समजत नाही. त्यांच्या पक्षाचे नेते पत्रकारांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करतात आणि स्वतःच पक्षाचे अध्यक्ष असल्याप्रमाणे वागतात, असा आरोपही रोहित पवार यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आपल्या पक्षाचे खासदार भेट घेणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. मतदारसंघातील विकासकामे आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी ही भेट होणार आहे. पंतप्रधानांची भेट मिळणे सोपे नसल्याने या भेटीचा डिलिमिटेशन विधेयकावरील मतदानाशी संबंध जोडू नये, असेही रोहित पवार यांनी स्पष्ट केले. मतदानाच्या दिवशीच सर्वांचे पत्ते उघड होतील, असे त्यांनी सांगितले.

### शिरपूरात सराफ व्यावसायिकाकडे

फिर्यादीनुसार, त्यांचे मालकीचे गांधी मार्केटमध्ये नंदुरबारकर सराफ या नावाने दुकान असून त्यांनी पाच ऑगस्टला रात्री दुकान बंद करुन सोन्याचांदीच्या दागिन्यांचा स्टॉक तपासला असता सहा लाख रुपये किंमतीचा ४० ग्रॅम वजनाची कर्णभूषणे असलेला बॉक्स चोरीस गेल्याचे आढळले. त्यांनी सीसीटीव्ही फुटेज तपासल्यावर दुपारी दोनला तीन अनोळखी बुरखाधारी महिलांनी कानातील दागिने पाहण्यासाठी मागितले व काहीच खरेदी न करता त्या निघून गेल्याचे दिसून आले. परिसरात शोध घेतल्यानंतरही संशयितांचा तपास लागला नाही. सराफ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात संशयितांविरोधात शहर पोलिस ठाण्यात अज्ञात संशयित महिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### निमडाळे शिवारात गौण खनिज चोरी

कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आले. कर्मचाऱ्यांनी त्यांना अटकाव केला असता संशयितांनी ट्रॅक्टर मधील वाळु उपसली. ट्रॅक्टर घेवुन पसार झाले. तत्पूर्वी वनपाल पाटील यांच्यासह सहकाऱ्यांशी हुज्जत घातली. आरडा ओरड, धक्काबुक्की व दहशत निर्माण केली. वनपाल भय्यासाहेब पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शरद भगवान पाटील रा. निमडाळे) त्याचा पुतण्या (नाव गांव माहीत नाही), व ट्रॅक्टर चालकसह पाच मजुर यांच्याविरुद्ध पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. सहाय्यक पोलीस निरीक्षक जिभाऊ पाटील तपास करीत आहेत.

### राज्यात पाचशे सव्वीस अनधिकृत

११ अनधिकृत शाळांची नोंद असून, पाच शाळा बंद आणि चार शाळांवर एफआयआर दाखल करण्यात आला आहे. नाशिक विभागात चार, छत्रपती संभाजीनगर विभागात चार आणि अमरावती विभागात दोन अनधिकृत शाळा आढळल्या आहेत. कोल्हापूर आणि लातूर विभागात एकही अनधिकृत शाळा नोंदलेली नाही.

विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न

मान्यता नसलेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश घेऊन शिक्षण सुरू असल्याने पालक आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाकडून कारवाई करण्यात येत असली, तरी मोठ्या संख्येने अनधिकृत शाळा सुरूच असल्याने शिक्षण विभागाच्या कारवाईच्या प्रभावी अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. अनधिकृत शाळांवर कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई करण्याची मागणी आता पालकांकडून होत आहे.

## शिरपूरला मंगळवारी सुवर्णप्राशन संस्कार शिबीर

शिरपूर, दि.९ - बालकांच्या आरोग्यविषयक काळजीबाबत आयुर्वेदिक परंपरेची माहिती पालकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने एस. व्ही. के. एम. संचलित सौ. कृतीबेन भूपेशभाई पटेल आयुर्वेद सिटी क्लिनिक, शिरपूर यांच्या वतीने मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी पुष्प नक्षत्राच्या दिवशी सुवर्णप्राशन संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबिरासाठी बालकांची पूर्वनोंदणी आवश्यक असून, इच्छुक पालकांनी आजच आपल्या पाल्याचे नाव नोंदवावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

शिरपूर शहरातील शिरपूर पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मागे, महाराजा कॉम्प्लेक्स येथे असलेल्या एस. व्ही. के. एम. संचलित सौ. कृतीबेन भूपेशभाई पटेल आयुर्वेद सिटी क्लिनिक मध्ये हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. बालकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने आयुर्वेदातील पारंपरिक संस्कारांची माहिती आणि त्याचा योग्य पद्धतीने अवलंब करण्याबाबत पालकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. आयुर्वेदात बालकांच्या संगोपनासाठी विविध संस्कार सांगितले आहेत. त्यापैकी सुवर्णप्राशन हा एक पारंपरिक बालसंस्कार मानला जातो. आयुर्वेदिक पद्धतीने तयार केलेले सुवर्णयुक्त द्रव्य विशिष्ट पद्धतीने बालकाला देण्याची ही परंपरा आहे. काही ठिकाणी याला सुवर्ण बिंदू प्राशन असेही संबोधले जाते. पारंपरिक आयुर्वेदिक दृष्टिकोनातून बालकाच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी तसेच आरोग्य संवर्धनासाठी सुवर्णप्राशनाचा उपयोग केला जात असल्याचे सांगितले जाते.


जय शदाराम

पगड़ी रस्म



श्री टेकचंद मुरलीधर रेलन
(गुरुनानक सोसायटी)
(आकाशदीप के मालिक)

पगडी रस्म दिनांक
10/8/2026
सोमवार शाम 5 बजे
मातोश्री हॉल
पूज्य बहावलपुरी पंचायत मे होगी।

परमपिता उनकी आत्मा को शांती प्रदान करें।

आकाशदीप | आकाशदीप मेन्सवेअर | न्यू आकाशदीप | आकाश हैंडलूम

अधिक जानकारी के लिए सम्पर्क 9822312125




रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान


**पाहिजेत**

कुसुंबा ते अक्कलपाडा दरम्यान शेती पाहिजे; हायवेटच ६ ते १० एकर पर्यंत विहीर किंवा बोअर असणाऱ्यास प्राधान्य ! टायटल फ्री आवश्यक !!
संपर्क : निरज अग्रवाल, अमळनेर
मो.9309782011
वेळ : संध्याकाळी ७ ते ८ पर्यंत


**उठावणा**



अत्यंत दु:ख के साथ सुचित करते है की, मेरी भाभी, एवं स्व.गोविंदलालजी इनकी धर्मपत्नी एवं. श्रीकिसन, अशोक, प्रमोद, अनिल इनकी चाचीजी एवं सुनिल, डॉ संजय इनकी ताईजी एवं मनोज, डॉ राजेश इनकी माताजी एवं. अजय, जय इनकी दादीजी

**श्रीमती प्रमिलाबाई गोविंदलाल अग्रवाल**

इनका स्वर्गवास शनिवार दि. ०८।०८।२०२६ को हुआ है। इश्वरईच्छा। जिनका **उठावणा** सोमवार दि १०.०८.२०२६ को दोपहर ४:०० बजे अग्रवाल विश्राम भवन, नदी किनारे रखा है।

श्री जयदेवजी गोवर्धनदासजी अग्रवाल, चालीसगांव वालों के तरफ का उठावणा यही पर दोपहर ०४:०५ बजे होगा।

-: शोकाकुल :-
मोहनलाल रुडमल अग्रवाल.
समस्त रुडमल रत्तूलाल गिंदोंडीया परीवार धुले


**पाहिजेत**

GOLD'S GYM
जेन्टस पर्सनल ट्रेनर - 4
जेन्टस ट्रेनर - 4
लेडीज ट्रेनर - 2
गोल्डस जिम, गांधी चौकाजवळ, आग्रा रोड, धुळे
संपर्क : 7517991991

**पाहिजेत**

किड्स वेअरसाठी सेल्समन आणि सेल्सगर्ल पाहिजे.
-: भेटा :-
सोना लेडीज वेअर किड्स वेअर
पारोळा रोड, धुळे
9767544005

**पाहिजेत**

- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट

संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**विकणे आहे**

विकास कॉलनी साक्रीरोड MSEB ऑफिस मागील ३५०० स्केअर फूट ३००० स्केअर फूट बांधकाम ४ प्लॉट बंगला योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
- संपर्क -
9421890419
9579438167

**भाड्याने देणे आहे**

MIDC अवधान येथील सर्व सोयीयुक्त कमर्शियल जागा ५५० स्के.फुट गाळे सहित, गृह उद्योगासाठी, लघुउद्योगासाठी, ऑफिससाठी, गोडाउनसाठी, राहण्यासाठी, करारानुसार भाड्याने देणे आहे.
: संपर्क:
8446456416

**पाहिजेत**

टायपिस्ट म्हणून मुलगा/ मुलगी पाहिजेत. इच्छुकांनी सायंकाळी ६ वाजता समक्ष भेटावे.
अनुभवी व्यक्तीस प्राधान्य
श्रीविनायक डायग्नोस्टीक सेंटर
हॉटेल गणपती पॅलेस समोर, मालेगाव रोड, धुळे

**फार्म हाऊसवर राखणदार पाहिजे**

फागणा येथे फार्म हाऊसवर कुटुंबासह राखणदार पाहिजे, रहायला पक्के घर, विज, पाणी सर्व मिळेल वय साठ वर्षा पर्यंत, फागणा सर्व सुविधा आहेत. भेटा धुळे येथे सर्व माहितीसाठी
०८८८८८२०५६५

**पाहिजेत**

होलसेल मेडिकलमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत.
१)कॉम्प्युटर ऑपरेटर अकाऊन्टंट
२) सेल्समन बाहेर गावांसाठी
३) मदतनीस
-: संपर्क :-
संजय मेडिकल्स
गल्ली नं. २ धुळे

**दुकान विकणे आहे**

मुख्य बाजारपेठ मधील गल्ली नं.४ येथील बालाजी मंदिरासमोर क्षेत्र (१०.०१) चौ.मी दुकान योग्य किंमतीत विकणे आहे.
- संपर्क -
8830291946

**पाहिजेत**

दाताच्या दवाखान्याच्या कामासाठी पुर्णवेळ, अर्धवेळ, मुलगा-मुलगी पाहिजे.
9823546330

५९ वर्षापासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...

Authorised Dealer
Godrej
LG Life's Good
Japan Premium

सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.

BAJAJ FINSERV | HDB FINANCIAL SERVICES

श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोन: (02562) 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०